# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government of Maharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4 Dated 27th Sept. 2011 State University Governed by Maharashtra University Act, 1994 )

## Office of the Director Students' Welfare

Dr.I.S. Mohurley
Director
Mobile: 7774027661, 9422893555

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: unigug.org/ gondwana.digitaluniversity.ac
Email : director.studentwelfaregug@ gmail.com


पत्र क्र. No.GU/DSW/129/2015 Dt:16/09/2015

प्रति,

१) मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
२) मा. विभागप्रमूख,
पदव्युत्तर शैक्षणिक विभाग,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**विषय: 'कमवा व शिका' योजना राबविणेबाबत.**

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयानुषंगाने आपणास कळविण्यात आनंद होत आहे की, महाविद्यालयीन आणि विद्यापीठीय शिक्षणाच्या कक्षेत उच्च शिक्षणाचा अंतर्भाव असल्याने विद्यार्थ्याला अध्ययन, अध्यापन व संशोधन एवढयापुरते मर्यादित न ठेवता त्याला संस्कृतीने वाढवावे, उच्च शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांवर श्रमसंस्कार व्हावेत व त्याने हा ठेवा निरंतन जपावा या हेतूने या वर्षापासून ''कमवा व शिका'' योजना सुरू करण्यात आली आहे. योजनेबद्दलची सविस्तर माहीती व प्रपत्र विद्यापीठाच्या www.unigug.org आणि www.gondwana.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. दि. १७ जुलै २०१५ रोजी विद्यार्थी कल्याणार्थ योजनांवर कार्यशाळा घेण्यात आली. प्रत्येक महाविद्यालयाला मार्गदर्शक पुस्तिका देण्यात आली व विविध योजनांकरिता प्रस्ताव पाठवावेत असे आवाहनही करण्यात आले.

परंतू विद्यापीठाकडे अल्प प्रमाणात प्रस्ताव प्राप्त झाले असून या योजनेचे प्रथम वर्ष असल्यामुळे विविध महाविद्यालयांकडून सदरहु योजना राबविण्यासाठी प्रस्ताव अपेक्षित आहेत. करिता आपणास आपल्या महाविद्यालयामध्ये सदरहु योजना राबविण्याच्या दृष्टीने दि. ३०सप्टेंबर २०१५ पर्यंत संचालक विद्यार्थी कल्याण गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांच्या कार्यालयास प्रस्ताव सादर करावा, हि विनंती.

धन्यवाद!

(डॉ. ईश्वर श्रा. मोहुर्ले)
संचालक विद्यार्थी कल्याण
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

संचालक
विद्यार्थी कल्याण विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

सहपत्रे:– वरीलप्रमाणे

प्रत माहितीस्तव :–

१. मा. कुलगुरु, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

## विद्यार्थी कल्याण विभाग

### कमवा आणि शिका योजना

**प्रस्तावना:**

महाविद्यालयीन आणि विद्यापीठीय शिक्षणाच्या कक्षेत उच्च शिक्षणाचा अंतर्भाव असल्याने विद्यार्थ्याला अध्ययन अध्यापन व संशोधन एवढयापुरते मर्यादित न ठेवता, त्याला संस्कृतीने वाढवावे हा शिक्षणाचा मुळ दृष्टीकोन आहे. उच्च शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यावर श्रम संस्काराचाही वर्षाव व्हावा, त्यांनी हा ठेवा निरंतन जपावा या उदात्त हेतूने **" कमवा आणि शिका "** योजना गोंडवाना विद्यापीठ सुरु करीत आहे.

**योजनेची उद्दीष्टे :**

१. आर्थिक दृष्टया दुर्बल,गरजू आणि होतकरु विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण संपादन करण्यासाठी आर्थिक सहाय्य करणे.
२. मानवी श्रमाची प्रतिष्ठा जोपासणे.
३. स्वयं रोजगाराच्या दृष्टीने विद्यार्थ्यांना प्रवृत्त करणे.
४. ज्ञान सेवक (Knowledge Servant) बनविणे.
५. श्रम संस्कृतीची (Work Culture) जाणीव निर्माण करणे.
६. विविध प्रकारची कामे करुन मिळणाऱ्या अनुभवाचा लाभ विद्यार्थ्यांना या योजने अंतर्गत होवू शकेल.

**योजनेकरिता पात्रता :**

ही योजना गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित असलेली विविध महाविद्यालये व विविध पदव्युत्तर शैक्षणिक विभागांमधुन पदवी अथवा पदव्युत्तर वर्गात उच्च शिक्षण घेणाऱ्या नियमित **(Regular)** विद्यार्थी/विद्यार्थिनींसाठी लागू राहील. या योजनेची अंमलबजावणी संबंधीत संलग्न महाविद्यालयामार्फत करण्यात येईल तथापी महाविद्यालयास " कमवा आणि शिका " योजना कार्यान्वित करण्यासाठी विद्यापीठाची मान्यता घेणे दरवर्षी अनिवार्य असेल. जी महाविद्यालये सरदहु योजनेच्या मार्गदर्शक तत्वांचा योग्य वापर करुन, योजना प्रभावीपणे राबवतील अशा महाविद्यालयांना पूढील वर्षी प्राधान्य देण्यात येईल.

**अर्ज करण्याची पद्धत :**

१. सदर योजना महाविद्यालयात/विद्यापीठाच्या पदव्युत्तर शैक्षणिक विभागात राबविण्यास मान्यता देण्याबाबतचे अधिकार मा. संचालक विद्यार्थी कल्याण यांना राहतील.
२. मान्यता प्राप्त करण्यासाठी विहीत नमुन्यात संचालक विद्यार्थी कल्याण यांचे कार्यालयाकडे प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. सदर प्रस्ताव मा. संचालक यांच्याकडे दि. १५ ऑगस्ट पुर्वी सादर करणे अनिवार्य आहे. त्यानंतर आलेल्या प्रस्तावांचा सदर योजना राबविण्यासाठी विचार केला जाणार नाही.
३. विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील गडचिरोली व चंद्रपूर या दोन्ही जिल्हयातील संलग्न महाविद्यालयाकडून आलेल्या प्रस्तावांची छाननी करुन नियमानुसार महाविद्यालयाची सदर योजना राबविण्यासाठी निवड केली जाईल.
४. तद्नंतर महाविद्यालयाला मान्यता पत्र पाठविण्यात येईल. मान्यता प्राप्त महाविद्यालयांनीच ही योजना राबवावयाची आहे.

**'अ' योजनेची अंमलबजावणी :**

" कमवा आणि शिका "या योजनेच्या प्रवेशा संदर्भातील सुचना महाविद्यालयाच्या सुचनाफलकावर लावून तसेच प्रत्येक वर्गामध्ये सूचना देवून विहीत नमून्यात अर्ज सादर करण्यासाठी आवाहन करणे.

१. विद्यार्थ्यांकडून प्राप्त झालेल्या सर्व अर्जाची छानणी करणे.
२. महाविद्यालयातील सल्लागार समिती मार्फत विद्यार्थ्यांची निवड करणे.
३. सल्लागार समितीचा निर्णय अंतिम राहील.
४. समितीव्दारे निवड केलेल्या विद्यार्थ्यांच्या यादीची एक प्रत मा. संचालक विद्यार्थी कल्याण यांचेकडे दि. २५ ऑगष्ट पर्यंत पाठविणे अनिवार्य आहे.

**'ब' योजने अंतर्गत करावयाची कामे:**

या योजनेमध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी खालील नमूद केलेली कामे करावीत. परंतू स्थानिक परिस्थितीनुसार सल्लागार समितीच्या मान्यतेने इतरही कामांचा समावेश महाविद्यालयाची गरज लक्षात घेवून करता येईल.

(१) कार्यालयीन कामे :– प्रशासकीय विभाग, ग्रंथालय, प्रयोगशाळा व अन्य विभागातील कामे, इत्यादी.

(२) तांत्रिक कामे :– संगणकावरील कामे, झेरॉक्स मशीन, टेलिफोन बूथ चालविणे, इत्यादी.

(३) फील्ड वर्क :– बागेची निगा राखणे, परिसरातील झाडांची निगा राखणे, खेळांची मैदाने तयार करणे व त्याची निगा राखणे, परिसर स्वच्छता करणे, गांडुळखत प्रकल्प राबविणे, नर्सरी युनिट तयार करणे, इत्यादी.

**'क' कामाचे तास:**

(१) विद्यार्थ्याला प्रत्येक दिवशी जास्तीत जास्त तीन (०३) तास कार्यालयीन काम देता येईल.

(२) ज्या दिवशी कार्यालयात सुट्टी असेल, त्या दिवशी कार्यालयीन काम बंद असेल व हजेरी पत्रकावर विद्यार्थ्यांच्या गैरहजेरीची नोंद घेण्यात येईल.

(३) विद्यार्थ्याला जास्तीत जास्त तीन (०३) तास फील्ड वर्क देता येईल. कार्यालयाला सुट्टी असेल त्या दिवशीही फील्ड वर्क करता येईल.

**'ड' कामाचा दर व (मानधन) देण्याची पद्धत:**

(१) या योजनेतील काम करणाऱ्या विद्यार्थ्याला त्यांनी केलेल्या कामाचा मोबदला म्हणून कामाच्या प्रती तासाला रु २०/– या प्रमाणे मानधन देण्यात यावे. यामध्ये कोणताही परस्पर बदल करु नये.

(२) विद्यापीठाच्या अधिकार मंडळाने विद्यार्थ्यांना द्यावयाच्या मानधनात कोणताही बदल/सुधारणा केल्यास महाविद्यालयांना कळविण्यात येईल.

(३) प्रत्येक महिन्यात त्यांनी केलेल्या कामाच्या एकुण तासाची गणना करुन त्याला देय असलेली मानधनाची एकुण धनादेशाव्दारे विद्यार्थ्यांच्या बॅक खात्यावर रक्कम जमा करण्यात यावी.

(४) धनादेश दिल्यानंतर विद्यार्थ्यांच्या नावासमोर हजेरी पत्रकावर धनादेश क्रमांक नमूद करावा व धनादेश मिळाल्याची विद्यार्थ्यांची स्वाक्षरी घ्यावी. ही योजना राबविणाऱ्या महाविद्यालयाने या योजनेकरिता स्वतंत्र बॅक खाते उघडणे आवश्यक आहे व ते खाते प्राचार्य आणि विद्यार्थी कल्याण अधिकारी यांचे संयुक्त स्वाक्षरीने चालविण्यात यावे.

**'इ' हजेरी पत्रक :**

(१) सदर योजनेमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या यादीनुसार विद्यार्थ्यांचे मासिक हजेरीपत्रक तयार करावे.

(२) हजेरीपत्रक विद्यापीठाने दिलेल्या विहीत नमुन्याप्रमाणेच असावे.

(३) हजेरीपत्रकामध्ये प्रत्येक दिवशी काम केल्याचे एकुण तास ,कामाचा मोबादला कामाचे स्वरुप व स्वाक्षरी असणे अनिर्वाय आहे.

(४) गैरहजर असलेल्या दिवशी **'X'** चिन्ह असावे.

(५) हजेरी पत्रकावर कोठेही उपस्थिती अथवा अनुपस्थितीबाबत अनुक्रमे **P** किंवा **A** नमूद केलेले नसावे.

(६) हजेरी पत्रकाच्या खाली विद्यार्थी कल्याण अधिकारी व प्राचार्यांची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे.

**'फ' वार्षिक हिशेब सादर करण्याची पद्धत :**

(१) प्रत्येक शैक्षणिक वर्षाच्या फेब्रुवारी अखेरपर्यंत ही योजना महाविद्यालयाने राबवावी.

(२) या योजनेचे सर्व हिशेब शैक्षणिक वर्षाच्या १० मार्च पर्यंत पुर्ण करावेत. या कालमर्यादेची कृपया नोंद घ्यावी.

(३) हिशेब तपासणीच्या वेळी खालील कागदपत्रे सादर करावे.

अ) कमवा व शिका योजनेच्या चालु शैक्षणिक वर्षातील मान्यतापत्राची प्रत.

ब) कामाचा तपशिलवार वार्षिक अहवाल.

क) योजनेसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांची यादी प्राचार्याच्या स्वाक्षरीसह.

ड) विद्यार्थ्यांचे मासिक हजेरीपट.

ई) विद्यार्थ्यांची मानधन दिलेली देयके, धनादेश क्रमांकासह, महाविद्यालयाचे बॅक पासबुक .

फ) खर्चाचे विनियोग प्रमाणपत्र व विवरणपत्रांवर सनदी लेखापाल, विद्यार्थी कल्याण अधिकारी व प्राचार्य यांची स्वाक्षरी व शिका आवश्यक आहे.

अन्य नियम :

(१) जे विद्यार्थी गरीब परंतु हुशार व होतकरु आहेत अशा विद्यार्थ्यांना या योजनेत प्रवेश द्यावा.

(२) सदरहु योजना फेब्रुवारी महिन्यापर्यंतच राहील व नंतर पून्हा नविन वर्षात १५ जुलैनंतर सुरु होईल.

(३) विद्यार्थ्यांची निवड सल्लागार समिती करेल व समितीचा निर्णय बंधनकारक राहील.

(४) विद्यार्थ्यांचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न रु १,००,०००/— पेक्षा जास्त नसावे या योजनेत जास्तीत जास्त १० विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावा.

(५) ज्या विद्यार्थ्यांना भारत सरकारची शिष्यवृत्ती किंवा तत्सम शिष्यवृत्ती राज्य शासनाकडून मिळते अशा विद्यार्थ्यांनी प्राधान्य देण्यात येवू नये.अशा विद्यार्थ्यांना जागा रिक्त असल्यास सल्लागार समितीच्या निर्णयानुसार प्रवेश द्यावा.

६) विद्यापीठाचे वतीने ७५ टक्के आर्थिक सहाय्य देण्यात येईल व महाविद्यालयाला २५ टक्के खर्च करावा लागेल.

डॉ. ईश्वर एस. मोहुर्ले
संचालक विद्यार्थी कल्याण

डॉ. विनायक एस. ईरपाते
कुलसचिव

डॉ. मुरलीधर जी. चांदेकर
कुलगुरु व अध्यक्ष

# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

## विद्यार्थी कल्याण विभाग

### कमवा आणि शिका योजना

प्रति,

मा. प्राचार्य / मा. संचालक,

______________________________

______________________________

विषय : कमवा व शिका योजनेत प्रवेश मिळण्याबाबत ...........

महोदय,

मी, आपल्या महाविद्यालयात / संस्थेत शैक्षणिक वर्ष २०१ —२०१ मध्ये या वर्गात प्रवेश घेतला असून, पुणे विद्यापीठाच्या गरीब व गरजू विद्यार्थ्यांसाठी असलेल्या कमवा व शिका योजनेत प्रवेश घेऊ इच्छिती. माझी व्यक्तिगत माहिती खालीलप्रमाणे आहे.

१. विद्यार्थ्याचे संपूर्ण नाव : ______________________________

(आडनाव प्रथम)

२. जन्मदिनांक व पूर्ण वय : ____________________मोबाइल क्र. ____________

३. धर्म व जात संवर्ग :____________________(सोबत जात प्रमाणपत्राची छायांकित प्रत जोडावी)

४. मागील वर्षी ज्या विद्यालयात/महाविद्यालयात शिकत होता /होती त्या —

अ ) महाविद्यालयाचे नाव व पत्ता : ______________________________

ब ) वर्ग : ______________________________

क ) मिळालेले गुण (% ) :______________________________

ड ) निकाल : उत्तीर्ण / सवलतीने उत्तीर्ण / अनुत्तीर्ण

ई ) मागील वर्षी कमवा व शिका योजनेत काम केले आहे काय ? होय / नाही

फ) मागील वर्षीचे कुटुंबाचे एकूण उत्पन्न रु.______________________________

५. पालकांची माहिती :

अ) वडिलांचे / पालकांचे नाव व पत्ता : ______________________________

______________________________

ब) व्यवसाय :______________________________

क) कुटुंबातील व्यक्तींची संख्या ______________________________

६. शासकीय / अशासकीय संस्थांच्या माध्यमातून शिष्यवृत्ती, विद्यावेतन, शुल्क सवलत अथवा अन्य आर्थिक मदत मागील वर्षी मिळाली होती काय ? होय / नाही

अ) मिळाली असल्यास किती रक्कम मिळाली ? रुपये ____________________

ब) या वर्षी अशा प्रकारची आर्थिक मदत मंजूर झाली आहे काय ? होय / नाही

क) वर नमूद केल्याप्रमाणे शिष्यवृत्ती, विद्यावेतन इ. शुल्क सवलतीसाठी अर्ज केला आहे काय ?

होय / नाही

या योजनेतील सर्व नियमांचे मी पालन करीन. माझ्याकडून सदर योजनेच्या नियमांचे उल्लंघन झाल्यास मला कमवा व शिका योजनेतून काढून टाकण्यास माझी हरकत नाही.

ठिकाण :

दिनांक :

(विद्यार्थ्याचे नाव व सही)

(मागे पहा)

माझ्या मुलाने/मुलीने /पाल्याने या अर्जामध्ये नमूद केलेली माहिती सत्य असून, तो/ती कमवा व शिका योजनेच्या सर्व नियमांचे पालन करील. त्याला /तिला या योजनेत प्रवेश घेण्यास माझी पूर्णपणे संमती आहे.

ठिकाण :

दिनांक :

(वडील/आई / पालकांची सही)

नाव :

---

## विद्यार्थी कल्याण अधिकाऱ्याची शिफारस

श्री./श्रीमती————————————————यांनी सन २०१ –२०१ मध्ये महाविद्यालयात ———————— या वर्गात प्रवेश घेतला आहे. या विद्यार्थ्याची सर्व संबंधित कागदपत्रे मी तपासली असून, या विद्यार्थ्यास /विद्यार्थिनीस कमवा व शिका योजनेत प्रवेश देण्यात यावा /देऊ नये, अशी शिफारस विद्यार्थी कल्याण सल्लागार समितीने केली आहे.

दिनांक :

विद्यार्थी कल्याण अधिकारी

---

## कार्यालयीन शेरा

श्री./श्रीमती ————————————————यांना कमवा व शिका योजनेत चालू शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश देण्यात आला आहे/नाही.

दिनांक :

विद्यार्थी कल्याण अधिकारी

मा. प्राचार्य/मा.संचालक

# विद्यार्थी कल्याण विभाग, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
# महाविद्यालयीन स्तरावरील कमवा व शिका योजना
# २०१ –२०१ साठी (प्रस्ताव)

१. महाविद्यालयाचे नाव व पत्ता :——————————————————

——————————————————————

२. महाविद्यालय स्थापनेचे वर्ष :——————————————————

अनुदानित / विनाअनुदानित:——————————————————

३. प्राचार्य नाव व :——————————————————

संपर्क क्र. (मोबाईल):——————————————————

४. विद्यार्थी कल्याण अधिकारी नाव :——————————————————

संपर्क क्र (मोबाईल) :——————————————————

५. विद्यार्थी कल्याण अधिकाऱ्यास मान्यता घेतलेली आहे का? : होय................. नाही ................

६. घेतलेली असल्यास कालावधी नमूद करावा : शै. वर्ष ......................ते शै. वर्ष ........................

(मान्यता पत्राची छायांकित प्रत जोडावी)

७. महाविद्यालयातील विद्यार्थी – संख्या :

| पदवी | | | पदव्युत्तर | | |
|---|---|---|---|---|---|
| मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूण |
| | | | | | |
| | | | | | |

८. महाविद्यालयातील प्राध्यापकांची संख्या : ——————————————————

९. महाविद्यालयातील शिक्षकेतर सेवकांची संख्या : ——————————————————

१०. महाविद्यालयाचा परिसर : क्षेत्रफळ : —————— इमारतींची संख्या :——————

प्रयोगशाळा : —————— उद्यानाचे क्षेत्रफळ : —————— कार्यशाळा :——————

**सल्लागार समिती सदस्यांची नावे :**

१. प्राचार्य : पदसिद्ध अध्यक्ष :——————————————————

२. संस्थाचालक प्रतिनिधी : सदस्य :——————————————————

३. प्राध्यापिका प्रतिनिधी : सदस्य :——————————————————

४. विद्यार्थिनी प्रतिनिधी : सदस्य :——————————————————

५. महाविद्यालयीन शिक्षकेतर सेवक : सदस्य :——————————————————

६. स्थानिक समाजसेवक : सदस्य :——————————————————

७. विद्यार्थी कल्याण अधिकारी (s.w.o.) : सचिव :——————————————————

११. सन २०१ –२०१ या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयातर्फे कोणते उपक्रम सदर योजनेअंतर्गत राबविता येतील, या संबंधीच्या आराखडा :——————————————————

——————————————————————

——————————————————————

——————————————————————

——————————————————————

——————————————————————

(टीप – विद्यार्थी कल्याण अधिकारी यांची मान्यता घेतलेली नसल्यास मा.प्राचार्यांनी/मा.संचालकांनी याबाबत स्वतंत्रपणे पत्र पाठवून ३ वर्षाकरिता मान्यता घेणे आवश्यक आहे.)

**विद्यार्थी कल्याण अधिकारी (S.W.O.)**
स्वाक्षरी व मोहोर

महाविद्यालयाची
मोहोर

**प्राचार्य**
स्वाक्षरी व मोहोर